REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# 'शरणकुमार लिंबाळे यांच्या 'बहुजन' कादंबरीतील सामाजिक समस्या चित्रण

डॉ. संभाजी मलघे
इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव, पुणे.

**सारांशः—**




मराठी साहित्यक्षेत्रात शरणकुमार लिंबाळे यांचे नाव सुपरिचित आहे. त्यांनी लिहिलेल्या 'बहुजन' या कादंबरीमध्ये त्यांनी सामाजिक समस्यांचे चित्रण केले आहे. जरी ही कादंबरी काल्पनिक असली तरी ती आजचे विदारक सामाजिक वास्तव व्यक्त करणारी आहे. दलित चळवळीची वाटचालही त्यांना या माध्यमातून व्यक्त करायची असल्याचे दिसून येते. आपल्या कादंबरी लेखनाची भूमिका स्पष्ट करताना ते म्हणतात— ''सन 1996 नंतरच्या काळात महाराष्ट्रातल्या दलित चळवळीचा काळ हा स्वतःला शोधण्याचा, सावरण्याचा, आस्तित्व टिकवण्याचा, एकविसाव्या शतकातल्या संक्रमणापुढं हतबल होण्याचा आणि मोठ्या पक्षाबरोबर फरपटत जाण्याचा होता. त्यामुळे दलित चळवळ थबकली, कार्यकर्ते हवालदिल झाले. काहींचा भ्रमनिरास झाला. देशपातळीवरील उग्र हिंदुत्ववादी वातावरण आणि महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळ या संदर्भात मी विचार करीत होतो. 'उपल्या' नंतर 'हिंदू' लिहिली असल्यामुळे 'उपल्या' नंतरचा काळ 'हिंदू' त आला आहे. 'हिंदू' नंतर 'बहुजन' लिहिली असल्यामुळे ह्या तीनही कादंबऱ्यातला कालक्रमपुढे सरकणारा दिसेल.''[1] या मनोगतातून कादंबरी लेखनामागची त्यांची भूमिका स्पष्ट होते.

**प्रस्तावनाः—**

सामाजिक परिवर्तन होत असताना वैचारिक मतभेद हे ठरलेले असतात. सामाजिक, धार्मिकतेच्या संदर्भात काय चूक, काय बरोबर याची चिकित्सा होत असते. हे प्रश्न धर्माशी निगडीत असल्यामुळे साहजिकच धार्मिकतेच्या अंगानेही चिकित्सा केली जाते. या चिकित्सेचा प्रतिवादही केला जातो. 'बहुजन' कादंबरीला या वैचारिक घुसळणींमधून द्वंद्वामधून वादविवादामधून जावे लागलेले आहे.

एखाद्या विचारधारेचा प्रचार करण्यासाठी प्रयत्न केले जातात. हा प्रचार होताना सामाजिक प्रश्न निर्माण होतात. या प्रश्नांचे सामुहिक स्वरुप कसे आहे? हे मांडण्याचा प्रयत्न शरणकुमार लिंबाळे यांनी 'बहुजन' या कादंबरीत केला आहे काय? त्याचे स्वरूप नेमके कसे आहे? या प्रश्नाची ढोबळमानाने उत्तरे शोधण्याचा प्रयत्न या छोट्या शोधनिबंधात केला आहे.

**झोपडपट्टीतील वर्चस्वाचा प्रश्न**

झोपडपट्टीतील लोकांवर आपले वर्चस्व रहावे यासाठी दादा मंडळी, गुंड मंडळी सतत प्रयत्न करीत असतात. त्यांचा वस्तीवर धाक असतो. या गुंडांच्या आपापसात हाणामाऱ्या होतात. आर्थिक फायद्यासाठी, सामाजिक प्रतिष्ठेसाठी आणि राजकीय लाभ मिळविण्यासाठी असे वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न होताना दिसतो. 'बहुजन' कादंबरीमध्ये असाच संघर्ष आला आहे. ''गरिबी हटाओ झोपडपट्टी' ही हिंदुस्थानची छोटी आवृत्तीच होती. ह्या वस्तीत सर्व जाती—धर्माचे लोक रहात होते. त्यांच्या जगण्याचा स्तर एक होता. ते सर्व गरीब होते. झोपडपट्टीत रहात होते; पण त्यांच्यातील सामाजिक स्तर अनेक होते. त्यांचे रीतीरिवाज भिन्न होते... कलशट्टी आणि बलशेटवार ह्या वस्तीचे मूळ पुरुष होते. सर्वजण

त्यांना झोपडपट्टी दादा म्हणून ओळखत होते. आपले वाद मिटविण्यासाठी लोक त्यांच्याकडे जायचे. त्यांचा शब्द अखेरचा मानला जायचा. वस्तीतल्या प्रत्येक प्रकरणात झोपडपट्टी दादाचं वर्चस्व असायचं.''[2]हे वर्चस्व मान्य करणं एवढेच झोपडपट्टीवाल्यांच्या हाती असतं त्यांच्या कलाने राहणं, मर्जीने राहणं हा त्यांच्या जगण्याचा भाग असतो. तो त्यांनी स्वीकारलेला असतो. किंवा त्यांना नाईलाजाने स्वीकारावा लागलेला असतो. चॅप्टर केसेस असणारे हे गुंड वरचेवर गुन्हे करीत असतात. त्यांच्या चेल्यांवरही गुन्हे दाखल असतात. सर्व प्रकारच्या सरकारी योजनांमधला लाभ, मलिदा आपल्याला मिळावा हा मुख्य हेतू या पाठीमागे असतो. राजकीय लोकांच्या सल्ल्यानुसार या झोपडपट्यांमध्ये विविध कार्यक्रम आखले जातात, राबविले जातात. सोईनुसार राजकारण केले जाते. राजकारण राबविले जाते. या सर्व गदारोळात सामान्य झोपडपट्टीवासी मात्र नाडला जातो. या सर्व घडामोडींचा अर्थ त्याला लागत नाही. कळसुत्री बाहुलीप्रमाणे त्याची अवस्था होते.

झोपडपट्टीमध्ये सगळे गरीब असले तरी त्यांच्या जाती वेगवेगळ्या असल्यामुळे त्यांच्यामध्ये सामाजिक दुरावा हा कायमचा राहतो. याचा फायदा हे गुंड घेताना दिसतात. 'बहुजन' कादंबरीमध्ये या वर्चस्वाशिवाय वेगळ्या प्रकारच्या वर्चस्वासाठीचा संघर्ष मांडला आहे, तो धार्मिक विचारधारेच्या वर्चस्वाचा प्रश्न आहे. हिंदुत्वाची विचारधारा बिंबविण्यासाठीचा आटापिटा कसा केला जातो. या प्रयत्नांमुळे सामाजिक वातावरण कसे ढवळून निघते ही सामाजिक समस्या 'बहुजन' कादंबरीमध्ये मांडली आहे.

## हिंदू–मुस्लिम ध्रुवीकरणाची समस्या –

भारताला स्वातंत्र्य मिळाले ते फाळणी होऊन. अखंड भारताची दोन शकले झाली. भारत आणि पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे जन्माला आली. स्थलांतराचा प्रश्नाने आणि हिंदू–मुस्लिम दंगलींनी या दोन समुहाची मने कायमची दुखावली गेली. काश्मिरचा प्रश्न चिघळला गेला. पुढे बांगलादेश पाकिस्तानपासून वेगळा झाला. भारत–पाकिस्तानमध्ये युद्धे झाली. ही सारी पार्श्वभूमी आजही खदखदते आहे. ह्या दुखऱ्या जखमा दोन्ही समुदायांच्या मनात कायम आहेत. या घटनेचे पडसाद आजही उमटत असतात. 'बहुजन' कादंबरीमध्ये ते मांडले आहेत. ''मुस्लिम जमावाने सूरजितचे घर फुंकले होते. सावळ्याने रोडवरील वाहने अडवून दहा हजारांची लूट मिळविली होती.

दंगलीमुळे हमीद आणि हमीदची बायको रुबिना आपल्या घरी आले नव्हते. बलशेटवारने हा डाव साधला होता. आणि त्याचे घर साफ केले होते. आगलावनी सरयदच्या आईचा विनयभंग केला होता. हिंदूंनी युनुसचे घर पटवले होते. संध्याकाळ झाली होती. दंगलींची अफवा पसरावी तशी काक्याच्या आत्महत्येची बातमी सर्व वस्तीत पसरली होती.''[3] दंगलीमधून धार्मिक तेढ निर्माण केली जाते. त्याचे राजकीय फायदे घेतले जातात. त्याचबरोबर लबाडणूक करून स्वतःचा स्वार्थ साधला जातो. दंगलीमध्ये केली जाणारी लूट म्हणजे माणसातील पशुत्वाचे भयाणक कृत्य होय. या लुटीमागे माणसाचे माणूसपण मृत्यू पावलेले असते, बंधुभावाचा गळा घोटलेला असतो. एक माणूस दुसऱ्या माणसाचा वैरी झालेला असतो. अशा दंगलीमध्ये माणसे हैवानासारखी वागत असतात. धर्मांध लोक धर्माचा घातकी कैफ चढवून खून करीत असतात, रक्त सांडवित असतात. एक धर्म हा दुसऱ्या धर्माचा बदला घेण्यासाठी तुटून पडत असतो. अशा परिस्थितीत कोणताही सारासार विवेक शिल्लक उरलेला नसतो. हे सर्व कशासाठी? या प्रश्नाची अनेक अंगांनी केलेली चिकित्सा म्हणजे 'बहुजन' ही कादंबरी होय. धार्मिक प्रश्न गुंतागुंतीचे केले जातात. लोकांच्या भावना धार्मिकतेच्या नावावर चेतविल्या जातात. मंदिर–मस्जिद प्रश्न निर्माण केले जातात. यामधून सर्वधर्मसमानता तत्त्वाला पायदळी तुडविले जाते. झुंडशाहीचा आधार घेऊन लोकशाहीचे प्राबल्य कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. या गंभीर प्रश्नांची चर्चा ही त्या काळाची गरज असते. ती एक प्रतिक्रिया असते. साहित्यिक त्याविषयीच्या भावना व्यक्त करीत असतो. समाजवास्तवाला आपल्या पद्धतीने मांडत असतो. बहुजन कादंबरीमध्ये हे आजचे समाजवास्तव मांडले आहे. यामुळे कादंबरीमध्ये मांडलेल्या समस्यांकडे गांभीर्याने पहावे लागते. ''कादंबरी हा बदलत्या समाजजीवनाबरोबर बदलत जाणारा वास्तवाश्रयी वाङ्मयप्रकार असून एका अर्थाने तो समाजजीवनाचा वाङ्मयीन दस्तावेज असतो.''[4] एवढेच नव्हे तर लेखकाची ही प्रतिक्रिया ही एका व्यक्तीच्या विचाराची प्रतिक्रिया असते. 'बहुजन' कादंबरीमधून शरणकुमार लिंबाळे यांनी 'हिंदू–मुस्लिम ध्रुवीकरणाची समस्या कट्टर धार्मिकतेच्या पार्श्वभूमीवरून मांडली आहे.

## बहुजनांना वंचित ठेवण्याचे षड्यंत्र –

'बहुजन' कादंबरीमधून बहुजनांना सर्वच बाबतीत नाडून त्यांना वंचित ठेवण्याचे षड्यंत्र स्पष्टपणे दाखवून दिले आहे. परिवर्तनवादी चळवळीत काम करणारे जे कार्यकर्ते असतात, त्यांना या कार्यापासून रोखण्यासाठी त्यांची जाणीवपूर्वक बदनामी केली जाते. झोपलेल्या समाजाला जागे करण्याचे काम हे कार्यकर्ते करत असतात. 'सदानंद कांबळे' ही या कादंबरीतील व्यक्तिरेखा याचेच प्रतीक आहे. ''वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर सदानंद कांबळेचा फोटो छापला होता. वर्तमानपत्रावर लोकांनी उड्या टाकल्या होत्या. काहीजणांनी धरणगावावर जाऊन वर्तमानपत्र विकत आणलं होत. सर्वांच्या तोंडी सदानंद कांबळेचाच विषय होता. सदानंद कांबळेचा रडलेला आणि हताश चेहरा वर्तमानपत्रांच्या फ्रंडपेजवर झळकला होता. ''मी पक्षासाठी निधी घेतला' अशी हेडलाईन छापली होती. अनेक वृत्तपत्रांनी सदानंद कांबळेंना नोटा स्वीकारताना खुले आम दाखवलं होतं. सदानंद कांबळे स्टिंग ऑपरेशनमध्ये अडकले होते. सदानंद कांबळेंना नोटांचे बंडल देणे, ते गुप्त कॅमेऱ्याने टिपणे आणि सी. डी. वाहिन्यांना पुरविण्याचे काम पद्धतशीरपणे पार पडले होते. सदानंद कांबळे होत्याचे नव्हते झाले होते. त्यांना तोंड दाखवायला जागा शिल्लक राहिली नव्हती.''[5] शरणकुमार लिंबाळेंनी अत्यंत मोजक्या शब्दात हा प्रश्न मांडला आहे. आघाडीवर लढणाऱ्या सैनिकांना अशा प्रकारे बदनाम केले जाते. त्यांना एक प्रकारे बहिष्कृत केले जाते. त्यांचे महत्त्व एका फटक्यात संपविले जाते.

राखीव जागांवर आपल्या मर्जीतले 'राखीव' निवडायचे आणि त्यांना 'होयबा' बनवायचे. बहुजनांच्या हक्काचा निधी भलतीकडे वळवायला. त्यांच्या योजना फक्त कागदोपत्री दाखवायच्या. प्रत्यक्ष सुधारणांपासून, हक्कांपासून या मोठ्या समुहाला वंचित ठेवायचे. हे या मागे मोठे षड्यंत्र आहे असे लेखकाने दाखवून दिले आहे. गायरान जमिनी म्हणजे वतनी जमिनी हे अस्पृश्यांच्या जगण्याचे साधन आहे, मात्र या जमिनी मिळू दयायच्या नाहीत. जमिनी मिळाल्या तर त्या जोरावर या गरीब जातीतले लोक सुधारतील शेतकरी होतील, मग अशा परिस्थितीत ते दुसऱ्याच्या शेतावर मजूर म्हणून जाणार नाहीत. या लढाईबाबत शरणकुमार लिंबाळे 'बहुजन' मध्ये म्हणतात– ''दलितांच्या हाडकी हाडवळयावर जमिनीचा वाद पेटला होता. माळरानाची ही जमीन होती. तशी ना पीकच होती. ही महाराची हाडकी हाडवळा होती. तात्या कांबळेच्या हत्येमुळे कबीर कांबळे शांत राहिला होता. दलितांच्या हाडकी हाडवळ्यावर वेद अध्ययन केंद्राची उभारणी झाली होती. हे अतिक्रमाण होते. दलितांनी आपल्या जमिनीचा कब्जा मिळविण्यासाठी कायदेशीर मार्गाचा अवलंब केला होता. आपल्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ते अधूनमधून मोर्चे काढत होते. वेद अध्ययन केंद्रामुळे दलितांच्या मागणीला धार आली होती.''[6] ही लढाई ही समतेसाठी, हक्कासाठीची लढाई आहे. या लढाईमागे सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक संदर्भ आहेत. या मागे धर्माचे प्राबल्य वाढविण्याचा डाव आहे. इतर धर्मांना कमजोरकरण्याचे ते प्रयत्न आहेत हे स्पष्ट होते. हे स्पष्ट होण्यासाठी लेखकाने आजच्या काळातील दाखले, पुरावे दिले आहेत.

या समस्यां सोडविण्यासाठी बहुजन समग्र परिवर्तनासाठी संघर्ष करीत आहेत. नव्या व्युहरचनेने नवी मांडणी करून, नवी लढाई लढवित आहेत. म्हणूनच दलित साहित्य अत्यंत वास्तववादी पद्धतीने मांडणी करीत आहे. 'बहुजन' कादंबरी याचा प्रत्यय देते. ''आंबेडकरांच्या विचारांनी साहित्यिकांना समाजोन्मुख केले आणि साहित्यात दलित, शोषित, उपेक्षित, यांच्याविषयी प्रेम आणि मानवतेचा दृष्टिकोन उभा केला. समाजसुधारणेला वेग मिळाला. अस्पृश्यता, भेदभाव नष्ट करण्याची एक जबरदस्त चळवळ उभी राहिली. मानवतेच्या या विचारप्रवाहाच्या केंद्रस्थानी 'मानव कल्याण' होते. यातून सर्वांचे लक्ष समानतेकडे वेधले गेले.''[7] समानतेकडे जाण्यासाठी जी जबरदस्त चळवळ उभी केली, ती चळवळ उभी करताना येणाऱ्या सामाजिक समस्यांचे चित्रण 'बहुजन' कादंबरीमध्ये शरणकुमार लिंबाळे यांनी केले आहे. म्हणून या अंगाने या सामाजिक समस्यांकडे पाहिल्यास या व्यापक लढ्यामधील या ठळक समस्यांची वेगळी जाणीव झाल्याशिवाय रहात नाही.

## संदर्भ–

1. लिंबाळे शरणकुमार, 'बहुजन' (कादंबरी) दिलीपराज प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती 15 जून 2007, पृ.7
2. लिंबाळे शरणकुमार, 'बहुजन', उपरोक्त, पृ.19
3. लिंबाळे शरणकुमार, 'बहुजन', उपरोक्त, पृ.100
4. ठाकूर रवींद्र, 'मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा', दिलीपराज प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, 2007 (मलपृष्ठ)
5. लिंबाळे शरणकुमार, 'बहुजन', उपरोक्त, पृ.133

6. लिंबाळे शरणकुमार, 'बहुजन', उपरोक्त, पृ.197
7. डॉ. त्रिभुवन शैलेश (संपादक), (त्रैमासिक) संदर्भलेख– 'दलित साहित्य संकल्पना आणि स्वरूप' डॉ. साळवे शशीकांत, पृ.45 (अंक जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर–2012)

LBP PUBLICATION